# प्रकरण सातवे

# उपसंहार

## प्रकरण सातवे

# उपसंहार

विविध वस्तुंचा संग्रह ज्या ठिकाणी केलेला असतो त्या ठिकाणाला सामान्यत: वस्तुसंग्रहालय अथवा संग्रहालय म्हणून संबोधले जाते. मानव मानसिकदृष्ट्या समाजप्रिय आणि संग्रहप्रिय प्राणी आहे. मानवाच्या या संग्रह करण्याच्या प्रवृत्तीला प्रारंभ अदिमानव काळापासून मानावा लागेल. कारण प्रथम तो अन्नाचा संग्रह करू लागला. त्यानंतर हत्यारे, प्राणी, वनस्पती, बियाणे, निसर्गातील चमत्कारिक वस्तूंचा संग्रह करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. काळानुरुप, परिस्थितीनुरुप याच्या स्वरुपात बदल होऊन वस्तुसंग्रहालय या संकल्पनेचा उदय आणि विकास झाला.

मानवी जीवनात वस्तुसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक दृष्टिकोणातून अनन्य साधारण महत्त्व असून आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात याचे महत्त्व वाढीस लागले आहे. वस्तुसंग्रहालय एक प्रकारचा आरसा आहे की, ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध अंगांचे प्रतिबिंब पडते. राष्ट्रीय दृष्टिकोणातून संस्कृती फार महत्त्वाची असते. ही सांस्कृतिक जडण-घडण जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तुसंग्रहालये पार पाडतात.

इतिहास लेखन शास्त्रात वस्तुसंग्रहालयास साधनात्मक महत्त्व आहे. इतिहासाचे पूर्वीच स्वरुप मर्यादित होते. फ्रेंच तत्वज्ञ अन्टोनिओ ग्रामशीने (१८९१-१९३७) प्रसृत केलेल्या 'सबाल्टर्न हिस्ट्री' (Hisotry from Below) या इतिहासाच्या बदलत्या संकल्पनेने इतिहासाला नवे रुप दिले व सर्वांगिण इतिहासाचे (History in Totality) स्वरुप जगापुढे ठेवले. यामध्ये अगदी दैनंदिन व्यवहार, पेहराव ते खाद्यपदार्थ पर्यंत महत्त्व दिले. याचा अभ्यास करण्यासाठी संग्रहालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. जागतिकीकरणामुळे स्थानिक व सांस्कृतिक इतिहासाला महत्त्व प्राप्त होत आहे. यामध्ये संग्रहालयाची भूमिका महत्त्वाची आहे. परंपरागत इतिहासकारांनी मळलेल्या वाटा पुसून नव

इतिहासकार आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून इतिहास जसा घडला तसा मांडण्याचा प्रयत्न करत आहे. ते संग्रहालयाच्या माध्यमातून शक्य झालेले आहे. आजच्या वैज्ञानिक युगात विज्ञानाच्या शाखा व उपशाखा विस्तारित झाल्या आहेत. सर्व शास्त्रे एकमेकांशी संबंधित व पूरक आहेत. त्यामुळे ज्ञानाबरोबर अनुषंगिक शास्त्राच्या ज्ञानाचीही कल्पना व माहिती आपणास होते. मनुष्याला सर्व काळातील परिस्थितीची माहिती करून देणे हा ज्ञानाचा खरा उद्देश आहे. तेव्हा सर्व प्रकारचे ज्ञान समाजाला करून देण्यात वस्तुसंग्रहालयाचा उपयोग महत्त्वाचा आहे.

आधुनिक शिक्षण पद्धतीत व शिक्षणाच्या माध्यमात झपाट्याने बदल होत चालले आहेत. यामध्ये दृक-श्राव्य माध्यमाला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. ज्या गोष्टी अनेक प्रकारे समजावून देखील समजत नाहीत तीच गोष्ट डोळ्यासमोर आल्याबरोबर चटकन आकलन होण्यास मदत होते. चित्रपट दूरदर्शन प्रमाणे वस्तुसंग्रहालय हे लहान मुले विद्यार्थी व अशिक्षित लोकांच्यासाठी शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. संग्रहालयाच्या माध्यमातून इतिहास, संस्कृती व विविध प्रकारच्या कलांचा परिचय व कला चेतनेचा व त्यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा निर्माण होण्यास मदत होते.

वस्तुसंग्रहालयांचा उदय व संग्रहालय विस्ताराचे प्रेरक घटक युरोपमध्ये दिसून येतात. इ.स.पू. १४०० मध्ये इजिप्तमध्ये संग्रहालयाची सुरुवात प्राणी संग्रहालयाने झाली. तथापि, आधुनिक व शास्त्रीय वस्तुसंग्रहालयाची चौकट युरोपमध्ये निर्माण झाली. याचा मुख्य प्रेरक घटक म्हणजे पुनरूज्जीवनाची चळवळ (Renaissance Movement) या चळवळीमुळे मध्ययुगीन युरोपचा चेहरा-मोहरा बदलून आधुनिकतेच्या वाटेवर उभे केले. मध्ययुगीन युरोपमध्ये धर्म संस्थाच्या कडव्या प्राबल्याचा एक परिणाम म्हणजे श्रेष्ठ कला मुल्यांचा ऱ्हास झाला होता. मात्र, पुनरूज्जीवन चळवळीने युरोपमध्ये वैचारिक, बौद्धिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविले. पुररूज्जीवन कालीन विचारवंताचा मूळ दृष्टिकोन विज्ञाननिष्ठ प्रवृत्तीत असल्याने मानवी स्वभावातील चौकसपणास प्राधान्य आले आणि प्रत्येक घटनेकडे, प्रत्येक नैसर्गिक बदल परंपरागत अंधेपणाने स्वीकारण्याऐवजी चौकपणे

आकलन करण्याकडे समाज वळला. परिणामत: शिक्षण, शिक्षणाचे स्वरुप व शिक्षणाचे उद्दिष्ठ याविषयी सखोल विचार होऊन ज्ञान संपादनाची नव दृष्टी आणि नविन दालने अस्तित्त्वात आली. पुनरूज्जीवनकालीन विचारवंतानी प्राचीन कला व साहित्यातून प्रेरणा घेतल्याने प्राचीन कला मुल्यांचा सर्व स्तरातून जतन व संवर्धन करण्याचा प्रयत्न होऊ लागला व ग्रीक-रोमन कला, साहत्य,विज्ञान, तंत्रज्ञान या विषयी नवीन दृष्टिकोन तयार झाला व ग्रीक रोमन अभिजात (Classical) कलेच्या संदर्भात नवमानसिकता लोकांच्या मनात विकसित होण्यास मदत झाली.

पुनरूज्जीवन चळवळीत इटलीने पुढाकार घेतला व इटलीतून सुरु झालेली पुनरूजीवन चळवळ पाहता-पाहता सर्व युरोपमध्ये पसरली. इटलीमधील पुनरूज्जीवन चळवळीचे पुरस्कर्ते राजे व श्रीमंत व्यक्तींनी स्वत:कडील मौल्यवान दुर्मिळवस्तू व कलाकृतीची प्रदर्शने मांडणयास सुरुवात केली. त्याचा परिणाम इतर देशात दिसून आला. फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला (१४९४-१५४९) यांने स्वत:जवळीत मौल्यवान वस्तूंचे 'फॉन्टेल ब्लू' येथे प्रदर्शन भरवण्यास सुरुवात केली. परिणामी ऐतिहासिक व मौल्यवान वस्तूंचे महत्त्व समजू लागल्याने त्यांचे संवर्धन करण्याची गरज व मानसिकता तयार झाली. मौल्यवान वस्तूंचे प्रदर्शन ही संग्रहालयाची मर्यादित संकल्पना मागे पडून संग्रहालयास सार्वजनिक स्वरुप प्राप्त झाले. परिणामी संग्रहालयाचा विकास आणि विस्तारालाजगभरात चालना मिळाली.

भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाचा उदय आणि विकासास ब्रिटिश सत्तेची स्थापना हा प्रेरक व काटक घटक ठरला. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दत प्रशासनाच्या सुलभतेसाठी ज्याप्रमाणे भारतीय समाजाला आणि प्रजेला ओळखण्याचे माध्यम म्हणून कंपनीच्या अधिकाऱ्यावर भारताचा इतिहास लिहण्याची जबाबदारी सोपवली त्याच प्रमाणे भारतीय संस्कृती बद्दल ब्रिटिश अधिकाऱ्याना कुतुहल होते. त्यामुळे त्यांना प्राचीन कला, शास्त्र, साहित्य यांचा शोध लावणे महत्त्वाचे वाटत होते. पुनरूज्जीवनाच्या प्रभावाखाली प्राचीन जीवन शैली आणि इतिहासामध्ये आस्था म्हणून ब्रिटिश प्राच्य विद्यापंडित सर विल्यम

जोन्स (१७४६-१८१४) यांनी प्राचीन भारतीय संस्कृतीत मोठ्या प्रमाणात रस घेतला. या संदर्भात इ.स. १७८४ मध्ये एशियारिक सोसायटी ऑफ बेंगाल या संस्थेची स्थापना हा महत्त्वाचा टप्पा ठरला. या संस्थेने प्राचीन भारतीय सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. त्यांचाच प्रयत्नातून इ.स. १७९६ मध्ये वस्तुसंग्रहालयाची स्थापना झाली. लंडनच्या 'एशियाटिक सोसायटी'ची पूरक संस्था असलेल्या 'मद्रास लिटररी सोसायटी'ने देखील संग्रहालय विकासात महत्त्वाची भूमिका बजावली.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे नवे दृष्टिकोन तयार होण्यास मदत झाली. नवदृष्टिकोणाचा एक भाग म्हणजे ऐतिहासिक दृष्टिकोणातून संग्रहालयाकडे पाहण्याचा नवदृष्टीकोन तयार होऊन प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दल नव्याने कुतुहल व प्राचीन ज्ञानाचा पुन्हा शोध घेण्याची व त्या अन्वये प्राचीन सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन करण्याची मानसिकता निर्माण झाल्याने संग्रहालय विकासास हातभार लागला.

इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोजणाच्या अर्धशतत्सांवत्सरिक उत्सवामुळे (१८८७) ब्रिटिश साम्राज्यात संग्रहालये स्थापण्यास चालना लाभली. याच चालनेतून भारतातमद्रास येथे 'व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्युट म्युझियम' व जयपूर, उदयपूर, राजकोट व विजयवाडा याठिकाणी संग्रहालये स्थापन करण्यात आली. व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन (१८९९-१९०५) यांची कारकीर्द सुद्धा संग्रहालय विकासास प्रेरक ठरली. त्यांना भारतीय संस्कृती विषयी आदर होता. त्याच प्रमाणे वसाहतवादी इंग्लंडचे रुपांतर साम्राज्यवादी इंग्लंडमध्ये झाले होते. या साम्राज्यवादी गोरवीकरणाचा एक भाग म्हणून भारतीय कलात्मक वस्तू मुख्यत: मुघल कालीन वस्तूचे जतन करण्याकडे आली. प्रदर्शने मांडण्याकडे कल होता. या विशेष प्रयत्नाची सुरुवात १९०४ च्या 'Ancient Monument Act' पासून झाली. ऐतिहासिक वस्तूंचाऱ्हास व नाश थांबविण्यासाठी कायद्यात्मक तरतूद केल्याने भारतीय संग्रहालय विकासास तो सहाय्यभूत घटक ठरला व संग्रहालय विकासाला चालना मिळाली. याशिवाय पुरातत्व विभागाचे सर जॉन मार्शल, डॉ. वो.पी. वोगल यांच्या प्रोत्साहनातून अनेक पुरातत्वीय व उत्खनन स्थान संग्रहालये अस्तित्वात आली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानात संग्रहालय स्थापनेसाठी प्रोत्साहन व मदत करावी यासाठी घटनात्मक तरतूद केल्याने भारतातील संग्रहालय विस्तारास मदत झाली.

कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालयांच्या विकासास पूरक परिस्थिती घटकामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कोल्हापूरला लाभलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी. इ.स.पू. २०० वर्षापासूनचा कोल्हापूरचा इतिहास ज्ञात आहे. ब्रह्मपुरी ही कोल्हापूरची आद्य वसाहत मानली जाते. सातवाहन काळात रोमन साम्राज्याशी व्यापारी संबंध निर्माण झालेले होते. चालुक्य काळात महालक्ष्मी देवालयाची निर्मिती झाल्याने कोल्हापूरला धार्मिक महत्व प्राप्त झाले. शिलाहार काळात पन्हाळगट हे राजधानीचे ठिकाण झाल्याने राजकीय महत्त्व वाढीस लागले. मध्ययुगीन अनेक निर्णयात्मक लढायांचा साक्षीदारआणि राजकीय उलथा-पालथीचा भाग होता. कोल्हापूर जवळील पन्हाळगडाने इहिसात आपली कायम स्वरुपाची छबी उमटवली आहे. सिद्धी जोहरचा वेढा हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाची घटना इथेच घडली. १७१० मध्ये महाराणी ताराबाईनी पन्हाळगडावर दुसऱ्या मराठी गादीची स्थापना करून स्वतंत्र कोल्हापूर राज्याची कोनशिला रोवली. कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालये ही इथल्या छत्रपतींच्या प्रोत्साहनाशिवाय अशक्य होती. संग्रहालयासंदर्भात तत्वम अनुकुलता निर्माण होण्याचे प्रारंभीचे श्रेय राजर्षि शाहूंना जाते. त्यांच्या उदार राजाश्रय, प्रोत्साहन आणि प्रेरणेतून संगीत नाट्य, चित्रपट चित्रकला, पोवाडा, तमाशा, भैदीक, क्रीडा व मर्दानी खेळ इत्यादी क्षेत्रात एका परिने पुनरूज्जीवन होऊन त्यास एक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण ओळख लाभली. संगीत सूर्य केशवराव भोसले, (संगीत) लहरी हैदर, (पोवाडा) भाऊ फक्कड, (तमाशा) महाराष्ट्र कोकीळे शंकरराव सरनाईक (गायक) गाविंदराव टेंबे (संगीत दिग्दर्शक व नाटककार) नटसम्राट बाल गंधर्व (नाटक), नारायणराव गोंगटे (कीर्तनकार) बाबूराव पेंटर (चित्रपट व चित्रकार) इ. विविध जाती धर्मातील कला क्षेत्रातील नवरत्ने त्यांच्या काळात निर्माण झाली. कला दिग्गजांच्या पाठीवर राजर्षि शाहू महाराजांचा वरदहस्त होता. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून व राजाश्रयातून आबालाल रहिमान

यांच्या सारखे प्रतिभावंत कलावंत चित्रकलेच्या क्षेत्रात निर्माण झाले. परिणामत: आबालाल ते गणपरातव वडणगेकर यांच्यापर्यत चित्रकाराची एक पिढी निर्माण झाली. या श्रेष्ठ चित्रकारांच्या कुंचल्यातून साकार झालेल्या अनेक प्रसिद्ध चित्रकलाकृती कोल्हापूरातील विविध संग्रहालयातून पाहावयास मिळतात. शाहू महाराजांच्या प्रमाणे त्यांचे वारसदार छ. राजाराम महाराज (१९२२-४०) यांनी विविध कलांना नुसते प्रोत्साहनच दिले नाही तर मनोरंजनाचे आधुनिक माध्यम चित्रपट, बोलपटाकडे ते स्वत: वळले आणि त्यांनी स्वत: एक कंपनी स्थापन केली. या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा लाभ चित्रपट निर्मितीला झाला. त्याप्रमाणे संग्रहालयाच्या उदयास व वाढीस आवश्यक उपयुक्त मानसिकता निर्माण झाली.

कोल्हापूरमधील वस्तुसंग्रहालय स्थापनेस प्रत्यक्ष योगदान लाभले ते शहाजी छत्रपती महाराज. शहाजी छत्रपतींच्या रुपाने लाभलेले इतिहासप्रेमी व्यक्तिमत्त्व. त्यांना इतिहासाविषयी आवड असल्याने इतिहास लेखन व संशोधनाला प्रोत्साहन आणि उदार हस्ते मदत केल्याने अनेक ग्रंथांचे प्रकाशन झाले. त्यांच्या या इतिहास प्रेमातून व उदारतेतून शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय स्थापन झाले.

कोल्हापूरमधील वस्तुसंग्रहालय विकासात शिवाजी विद्यापीठ स्थापनेमागची भूमिका महत्त्वाची ठरते. महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृती, मराठी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासाला व विकासाला प्राधान्याने चालना देण्याचे हा या विद्यापीठाच्या स्थापने मागचा महत्त्वाचा हेतू होता. यातूनच पुढे तत्कालिन कुलगुरु इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक व संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार (१९६२-१९७५) यांच्या पुढाकारातून शाहू संशोधन केंद्राची स्थापना झाली. या संशोधन केंद्राचा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून साकार होत असलेला महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणजे 'शाहू लोक जीवन मुझियमची' संकल्पित वस्तू होय. त्याच प्रमाणे महाराष्ट्राचा आणि मराठ्यांच्या इहिास संशोधनाला राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय स्तरावर चालना देण्यासाठी 'सेंटर फॉर स्टडीज इन मराठा हिस्ट्री' स्थापना केलेली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमाचा एक भाग म्हणून मराठीतील

थोर साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित झालेले पहिले मराठी साहित्यिक वि.स. खांडेकर यांच्या स्मृती उत्तरोत्तर पिढ्यासाठी कायमस्वरुपाची राहावी यासाठी वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयाची स्थापना केलेली आहे

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकास संग्रहालय निर्मितीस अनुकूल परिस्थिती लाभली असली तरी विसाव्या शतकात उत्तरार्धापासून वस्तुसंग्रहालय विकासास बाधक अशी मानसिकता निर्माण होत आहे. जिथे निकष मुख्यत: आर्थिक अंगाशी निगडीत आहेत त्याला आज जागतिकीकरण प्रक्रिया असा उल्लेख होतो. या आर्थिक प्रक्रियेअंतर्गत आर्थिक बाबींना आर्थिकदृष्टीने फायदेशीर घटक आणि उपक्रमांना प्राधान्य देण्यात येत आहे. याचा एक दृश्य परिणाम म्हणजे आर्थिक उद्दिष्ठ नसलेल्या पण सरकार आणि इतर घटकांच्या आर्थिक मदतीवर अवलंबून असलेल्या सामाजिक उद्दिष्ठांनी प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या अनेक संस्था मोडकळीस निघण्यात होत आहे. वस्तुसंग्रहालय एक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था आहे. संग्रहालयाचे उद्दिष्ठ नफा मिळविणे हा नसतो. या पार्श्वभूमीवर संग्रहाय भविष्यावर आर्थिक बाबीचा काय परिणाम होवू शकतो याचा वेध घेण्याचा या संशोधकाचा मानस होता. पण त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक स्वरुपाची माहिती या संशोधनास संबंधित संग्रहालयाकडून उपलब्ध करून देण्यात आली नाही ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. आजच्या माहिती तंत्रज्ञान व माहिती अधिकार आणि पारदर्शकता ही वैशिष्ट्ये असलेल्या युगामध्ये या संदर्भातील संबंधित संग्रहालय प्रशासनाची उदासिनता आणि अनास्था ही माझ्यासारख्या नव तरुण संशोधकाच्या दृष्टीने दु:खद बाब आहे. या संदर्भात जी थोडीफार आकडेवारी उपलब्ध झाली त्या अनुषंगाने संग्रहालय संबंधीत आर्थिक बाबी मांडता येतात. सर्वप्रथम या संशोधकाने वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या निश्चित करण्याचा प्रयत्न केला. भेट देणाऱ्या पर्यटकाची कुठेही कागदोपत्री नोंद आढत नसल्याने प्रवेश शुल्काचा आधार घेतलेला आहे. कोल्हापूर वस्तुसंग्रहालयास प्रौढासाठी ३ रुपये व विद्यार्थी व लहान मुले यांच्यासाठी १ रुपया इतका प्रवेश शुल्क आहे. या संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची

सरासरी वार्षिक संख्या ८०००० च्या आसपास भरते. यामध्ये सरासरी २०००० इतकी संख्या लहान मुलांची आहे. या पर्यटकांच्या प्रवेश शुल्कातून २,००,०००/- रुपये प्राप्त होतात. मात्र संग्रहालय प्रशासन व व्यवस्थापनावर होणारा खर्च यात फार मोठी तफावत आहे. कारण संग्रहालय अभिरक्षकाचे वेतन १०,०००/-, टंकलेखन ६,५००/- व चार सेवक व एक सुरक्षारक्षक ४,५००/- असे आहे. याचे वार्षिक वेतन व संग्रहालय व्यवस्थापनाचा खर्च पाहता हे संग्रहालय तोटा सहन करून केवळ शैक्षणिक व सांस्कृतिक जाणिवेतून सरकार हे संग्रहालय चालवत आहे हे सिद्ध होते.

न्यू पॅलेस संग्रहालय स्थापन करते वेळी शहाजी छत्रपतीनी तीस लाख रुपयांची आर्थिक तरतूद केलेली आहे. त्याच्या व्याजातून संग्रहालयाचे प्रशासन व व्यवस्थापन व्हावे अशी व्यवस्था आहे. या संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची सरासरी वार्षिक संख्या १,६०,०००/- आसपास आहे. या संग्रहालयास १३ रुपये प्रवेश शुल्क आहे. संग्रहालय प्रवेश शुल्कातून २०,८०,०००/- इतके वार्षिक उत्पन्न मिळते. या संग्रहालयाचे प्रशासन व व्यवस्थापनावरील खर्च पाहता संग्रहालय फायद्यामध्ये चालते आहे.

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक उपक्रमशिलतेला महत्त्व देऊन दहा लाख रुपये खर्च कयन वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय स्थापन कले आहे. या संग्रहालयास प्रवेश शुल्कातून मिळणारे उत्पन्न नाममात्र आहे. मात्र संग्रहालय प्रशासनावर होणारा खर्च पाहता हे संगहालय तोटा सहन करून विद्यापीठ चालवते आहे.

कोल्हापूरात वार्षिक पाच लाखापेक्षा जास्त पर्यटक भेट देतात. मात्र संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांत तफावत आहे. यामध्ये प्रशासनाची उदासिनता अकार्यक्षमता व अनास्था कारणीभूत आहे. थोडासा व्यवसायिक दृष्टिकोन ठेऊन संग्रहालयाची प्रसिद्धी दिल्यास संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत फरक पडू शकतो. परिणामी उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

ब्रह्मपुरी ही कोल्हापूरची आद्य वसाहत मानली जाते. या ठिकाणी पुण्यातील डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटयूट या संस्थेमार्फत डॉ. एच्.डी. सांकलिया व डॉ. एम.जी. दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स. १९४५-४६ मध्ये उत्खनन झाले. या उत्खननामध्ये रोमन, सातवाहन, उत्तर सातवाहन, शिलाहार व बांगड्या,दगडी वस्तू व शिल्पाकृती प्राप्त झाल्या. या पुरातत्वीय वस्तूचे जतन व सवंर्धन व्हावे व त्या अन्वये कोल्हापूरचा ऐतिहासिक वारसा जिवित राहावा या दृष्टिकोणातून इ.स. १९४६ मध्ये कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची स्थापना झाली. इ.स. १९४९ मध्ये कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाची स्थापना झाली. इ.स. १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान विलिन झाले व सरकारकडून मिळणारे तनख्ये बंद झाले. त्यामुळे नवनि राजवाड्याची पूर्वीच्या इंतमामाने देखभाल होईल असे शहाजी छत्रपतींना वाटत नव्हते. याशिवाय करवीर छत्रपती घराण्याचा व राजर्षि शाहू महाराजांच्या स्मृती जागृती राहतील. या उद्देशाने १९७१ मध्ये शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय विश्वस्त मंडळाची स्थापना केली. शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालयाची जन्मशताब्दी वर्षा निमित्त १९४७ मध्ये शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालयाची स्थापना झतली. तर मराठी साहित्यात स्वत:च्या लेखनीने स्वतंत्र स्थान निर्माण केलेले व मराठी साहित्याला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे थोर साहित्यिक वि.स. खांडेकर यांच्या समग्र साहित्यिक योगदानाचे जीवन व कार्याचे नवीन पिढीला दर्शन व्हावे व वाचन संस्कृतीची व साहित्याची जोपासना व्हावी या दृष्टिकोणातून २००५ मध्ये वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयाची स्थापना झाली.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेल्या बहुतांश पुरातत्वीय वस्तू ब्रह्मपुरी उत्खननातील आहेत. सातवाहन काळातील तांबड्या झिलईची भांडी व रोमन मद्यकुंभाची भांडी चकचकीत व पातळ आहेत. ही भांडी रोमन साम्राज्याच्या व्यापारी संबंधातून आलेली आहेत. कारण उत्तर सातवाहन व शिलाहार काळातील भांडी व खापरे जाडीभरडी व अशुद्ध चिखलाची आहेत. मात्र ती चाकावर केलेली आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होण्यास मदत होते की, कोल्हापूर सातवाहन काळात कोल्हापूरचे रोमन साम्राज्याशी व्यापारी संबंध निर्माण झालेले होते. रोमनाचा व्यापार जरी कोकण किनारपट्टीवर होत

असला तरी कोकण व देश यांना जोडणारे घाट माथ्यावरील ठिकाण म्हणून कोल्हापूरला महत्त्व असावे. सातवाहन व उत्तरवाहन काळातील मणी चकचकीत आहेत. या रोमन बनावटीची छाप आढळते. मात्र शिलाहार बहामनी काळातील मण्यात चकचकीतपणा व बनावटीतील रंगाचा उजळपणा दिसून येतो ती पारदर्शकता व रंगाचा उजळपणा बहामनी काळातील बांगड्यामध्ये दिसून येतो. ती पारदर्शकता व रंगाचा उजळपणा बहामनी काळातील बांगड्या मध्ये दिसून येत नाही. यावरून तत्कालीन रंगतंत्रात झालेली घटच म्हणावी लागेल.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयातील बहुतांश शिल्पाकृती कोल्हापूर, रायबाग, मिरज, महालक्ष्मी मंदिरातून तर पंचधातूच्या शिल्पाकृती ब्रह्मपुरी उत्खननात मिळालेल्या आहेत. यामध्ये मध्यकालीन शिल्पाकृतीची संख्या अधिक आहे. पोसायडनच्या पंचधातूच्या शिल्पाकृतीमुळे कोल्हापूर रोमन यांच्यातील व्यापारी संबंधाला दुजोरा मिळतो. कारण ही ग्रीको-रोमन बनावटीची शिल्पाकृती आलेक्झांड्रिया मधून आलेलीअसावी असे तज्ञांचे मत आहे. इत्तीस्वाराच्या शिल्पाकृतीतून सातवाहन काळात आलेली धातूकामातील वैशिष्ट्य दिसून येतात व या शिल्पाकृतीवरून तत्कालिन पेहराव्यावर प्रकाश पडतो. स्त्रियांच्या हातातील बांगड्या,केशरचना, वाळे,कमरपट्टा व लुगड्या सारखे वस्त्र त्याकाळातील स्त्रिया वावरत असाव्यात. स्त्री व पुरुष दोन्ही कर्णकुंडले वापर, खांद्यावर उत्तरीय टाकण्याची पद्धत त्यावेळी देखील होती. पुरुष बहुधा धोतरासारखे विऱ्या करून वापरत असावेत असे दिसून येते.

मातृदेवतेची शिल्पाकृती, अर्चनाकुंड, दगडी शिवलिंग इ. माध्यमातून तत्कालिन समाजात प्रचलित असलेल्या धार्मिक प्रथा व परंपरावर प्रकाश पडतो. उत्खननात आढळलेल्या करंडकावरून सातवाहन काळात या प्रदेश बौद्ध धर्माचा प्रभाव व प्रसार झालेला होता हे सिद्ध झालेलेआहे. मात्र मातृदेवतेच्या शिल्पाकृतीतून मातृसत्ताक पद्धतीचे अस्तित्व जाणवते. ही मातृदेवतेची पूजा पुढील काळात रुढ होत जाऊन महालक्ष्मीच्या रुपात रुढ झाली असावी. कारण महालक्ष्मीस लौकिक अर्थाने 'अंबाबई' म्हणतात. 'अंबा'

म्हणजे 'माता' यांचा उगम या मातृका मूर्तीतून झाला असावा. वीरगल व दगडी शिल्पाकृतीच्या माध्यमातून शिल्पकलेत झालेला बदल दिसून येतो. शिल्पाकृतीची रचना, प्रमाणबद्धता, पोषाख, हत्यारे, उलंकार, पोषाख, केशभूषा इ. विषयी माहिती मिळते. चंद्राच्या शिल्पातील चंद्राच्या सोळा कला, श्रीयंत्रयुक्त शिवलिंगातील शिव आणि शक्ती यांचा संयुक्त दाखविण्याचा प्रयत्न, व मदनानी शिल्पाकृती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तर वीरगलच्या माध्यमातून तत्कालिन समाजात वीरमरण पत्करलेल्या पुरुषाबद्दलची कृतज्ञता दिसून येते. वीरलगल मध्ये दाखविलेल्या ढाली व हत्यारे मधून काही प्रमाणात शस्त्र व युद्ध पद्धतीवर प्रकाश पडतो ही वरगल पूर्वमध्ये युगीन काळातील असून ढालीचा आकार जवळ-जवळ पूर्ण शरीर झाकण्या इतका, तलवारी आकूड आहेत. ही वीरगल महाराष्ट्रातील असल्याने तत्कालिन योद्धे उंचीप्रमाणे आकूड तलवारी वापतर असावे. मात्र मुघल किंवा मराठा काळात ढालीचा आकार कमी झाला व तलवारींचा आकार वाढला असेच दिसून येते. वीरगल मध्ये सामान्यत: वीर पुरुष शिवलिंगाची पूजा करताना दर्शवलेला असतो. मात्र यामध्ये तो देवीची पूजा करताना दर्शविलेला आहे. हा बहुधा स्थानिक धार्मिक प्रभावाचा कसा परिणाम होतो. सिंहाचे मुखवटे, मध्यकालीन मातीची वाघ, इ. माध्यमातून लहान मुलाच्या मनोरंजनाच्या साधनावर प्रकाश पडतो.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालय व न्यू पॅलेस या दोन्ही ठिकाणी शस्त्रास्त्रे मोठ्या प्रमाणात असली तरी कोल्हापूर वस्तुसंग्रहालयातील शस्त्रास्त्रांची संख्या अत्यल्प आहे. व न्यू पॅलेसमधील शस्त्राशी साम्य असणारी आहेत. या शस्त्रामधून तत्कालिन युद्ध पद्धतीत व शस्त्रास्त्र बनावटीत झालेला बदल निदर्शनास येतो. प्राचीन काळातील तलवारी मुसलमान सत्ताधिशांच्या आगमनानंतर तलवारीच्या बनावटीत विविधा आली. तर पोर्तुगीजाच्या आगमनाने सरळ दुधारी पात्याच्या तलवारी लोकप्रिय झाल्या. न्यू पॅलेस मध्ये साधारण ३०० च्या आसपास तलवारी असून यामध्ये धोप, खांडा, निमचा, इराणी-तेगा, मराठी-तेगा इ. तलवारी आहेत. यामध्ये कर्नाटकी धोप, खांडा, मराठा-तेगा, इ. तलवारी जास्त प्रमाणात आहेत. कारण या मराठा सैन्यात अधिक वापरल्या जात असत. या तलवारीचे

वैशिष्ट्य म्हणजे यांची परज जाड व खांडा व मराठा तेगा मराठा सैन्यात अधिक्याने प्रचारात होत्या. तर पट्टा व विट हे दोन शस्त्राचे प्रकार खास मराठ्यांनी विकसित केले व याचा युद्धात प्रचूरतेने वापर होत असे. कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात मिश्र धातूची इ.स. १६१० मधील पोर्तुगाल बनावटीची तोफ वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही तोफ ओतवी स्वरुपातील असून तीन भागात यावर कलाकृती कोरलेल्या आहेत. तर न्यू पॅलेस मधील १० फूटी रुंद असलेली प्राथमिक अवस्थेतील तोफ बजा बंदूक वैशिष्ट्यपूर्ण आहे. बहुधा याचा उपयोग जाहजावर किंवा किल्ल्यावर होत असावा.

चित्रकला कृतीच्या माध्यमातून कोल्हापूरमध्ये निर्माण झालेल्या चित्रकला प्रवाहाचे दर्शन होते. या चित्रकला कृतीमध्ये प्रामुख्याने व्यक्तिचित्र व निसर्ग चित्रांचा समावेश अधिक आहे. तैलरंग व भावना व्यक्त होतात. यामध्ये सर्वच कलाकृती उच्च प्रतिच्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आबालाल रहिमानयांची 'बोअर हंटिंग, बाबूराव पेंटरांची उषःकाल' गणपतराव बडणगेकरांची 'गोसावी', रा.शि.गोसावी यांचा 'इंदूमती', दत्तोबा दळवी यांची 'रायगडावरील शिव छत्रपतीची समाधी' बाबुराव सडवेलकर यांची 'बॉम्बे स्ट्रीट', रविंद्र मेस्त्री यांची 'सुलू', 'सुचेला', 'सुधा', मधुकर पोवळे यांची 'गाढनिद्रा', के.बी. कुलकर्णी यांची 'प्रतिक्षा' इ. चित्रकलाकृती वैशिष्ट्यपूर्ण व प्रसिद्ध आहेत.

साठमारीची हत्यारे व छायाचित्रातून या मर्दानी खेळाची कल्पना येते. धाडस, चपळता, चातुर्य व जिद्द यामधून प्रत्ययास येते. साठमारी ही फक्त दोनच ठिकाणी खेळली जात होती. बडोदा व कोल्हापूर. मात्र, बडोद्यापेक्षा कोल्हापूर मधील साठमारी अधिक लोकप्रिय झाली. कारण बडोद्यामधील साठमारी घोड्यावरून हातअसे तर कोल्हापूरमधील साठमारी पायी होत असे. शाहू महाराजांनी या खेळात शास्त्रशुद्ध पणा आणण्यासाठी खास प्रशिक्षित साठमार तयार केले. साठमारीचे हत्यारे स्वत: लक्ष देऊन 'टेक्निकल स्कूल' मधून तयार करून घेतली. अशा या वैशिष्ट्यपूर्ण खेळाचे छायाचित्राच्या माध्यमातून दर्शन होते.

संस्थान काळात मोठ्या प्रमाणात शिकार चालत असे. याशिकार केलेल्या प्राण्याच्या अवयवापासून तयार केलेल्या दैनंदिन वापरातील वस्तू व पशू पक्षांच्या शरीरात

पेंढा भरून तयार केलेले भोद (स्टफ) यांचा सुशोभिकरणासाठी केलेली वस्तू तत्कालीन समाजातील मानसिकता दर्शविते. दुर्मिळ प्राण्याची शिकार झाली. आजते पशु-पक्षी आपले अस्तित्व गमावून बसलेले आहेत. त्यामुळे हे पंढा भरून तयार केलेले दुर्मिळ पशु-पक्षी तत्कालिन समाजात रुढ असलेल्या मुक्या जनावरांच्या बद्दलची मानशिकता दर्शविते. आज शिकार करणे कायद्यात्मक गुन्हा ठरवलेला आहे. समाजात निसर्गाबद्दल व पशुपक्षाबद्दल जागृता निर्माण झालेली आहेत. तत्कालिन समाजात याचा अभाव होता व त्यातून झालेली निसर्गाची हानी याचा पुरावा आहे. पशुपक्षाच्या अवयवापासून तयार केलेल्या दैनंदिन जीवनातील वापराच्या वस्तूवरून असे जाणवते की, १८५७ मध्ये डुकराच्या चरबीच्या आवरणामुळे १८५७ चा बंड झाला. मात्र प्रस्तुत संग्रहालयातील डुकराच्या दाताचा 'अॅश ट्रे' टेकण्याची काठी यातून मानवाचा मानसिकतेत झालेला बदल दर्शविते.

अलंकार, पोषाख, पगड्या, राजचिन्हे, वाद्य, हस्तकला यामधून तत्कालिन समाजातील सांस्कृतिक जीवनाविषयी दृश्यस्वरुपात आकलन होण्यासाठी मदतगार आहे. राजर्षि शाहू महाराजांच्या जीवनातील दुर्मिळ छायाचित्रातून शाहू महाराजांचा भारदस्तपणा, चालण्यातील रुबाब, करारीपणा, इत्यादीचे दर्शन होते.

कोल्हापूरातील पर्यटन विकासात या वस्तुसंग्रहालयाची भूमिका महत्त्वाची आहे. तथापि, ही संग्रहालये प्रसिद्धीविना दुर्लक्षित आहेत. त्यामुळे कोल्हापूरात खास संग्रहालये पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या अपवादात्मक आहे. हैद्राबाद मधील सालारजंग, मंबईमधील 'प्रिन्स ऑफ वेल्स', पुण्यातील राजा केळकर, वस्तुसंग्रहालयास खास भेट देणाऱ्या पर्यटकांची संस्था लक्षनिय आहे. मात्र कोल्हापूर बाबत असे दिसत नाही. ९६ टक्के पर्यटक असे आहेत की ते कोल्हापूरला विविध कारणासाठी येतात. उदा. महालक्ष्मी, नृसिंहवाडी, ज्योतिबा दर्शन, स्वकियांना भेटणे, शैक्षणिक, व्यावसायिक इ. कारणासाठी येतात व मिळालेल्या मोकळ्या वेळेत त्यांना माहित असलेल्या संग्रहालयांना भेट देतात असेसर्वेक्षणातून आढळून आले आहे. तर फक्त ४ टक्के पर्यटक ३ संग्रहालयासभेट देण्यास

येतात. कोल्हापूर मध्ये येणाऱ्या पर्यटकांची सरासरी संख्या पाच लाखाच्या आसपास आहे. असेअसूनही संग्रहालयस भेट देण्याऱ्या पर्यटकांची संख्येत फार माठी तफावत आहे. कारण या संग्रहालयाची प्रसिद्धी नाही. जाहिरातहोत नाही, कोल्हापूरमधील महत्त्वाच्या स्थळावर संग्रहालय दिशादर्शक फलक नाहीत. त्यामुळे सरासरी ५० टक्के पर्यटकांना संग्रहालये माहित नाहीत. संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांना संग्रहालय प्रशासनाकडून मार्गदर्शन व माहिती दिली जात नाही. परिणामी पर्यटकांची कुचंबणा होते व संग्रहालयाबाबत कुप्रसार होतो. पर्यटकांना मिळणाऱ्या पायाभत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे पिण्याचे पाणी, शौचायले, बसण्यासाठी बाक, दिशा दर्शक फलक, इ. सोय करणे महत्त्वाचे आहे.

कोल्हापूरमधील पर्यटन विकासाचा एक स्त्रोत म्हणून कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व व भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे. ऐतिहासिक सांस्कृतिक व शैक्षणिक भूमिका पार पाडणारी ही संग्रहालये कोल्हापूरात येणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण आहे. कोल्हापूरात येणारे एकूण पर्यटक व संग्रहायास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत जी तफावत असली तरी संग्रहालय स्थानिक वृत्तपत्रे व पर्यटकांच्या प्रतिक्रियामधून दिसून येतात. संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या प्रतिक्रियामधून दिसून येतात. संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची केलेल्या सूचना महत्त्वपूर्ण असून भावी काळात जर संग्रहालयाचा विकास व त्या अनुषंगाने पर्यटन विकास अपेक्षित असेल तर वरील सूचनांचा संग्रहालय विकासास अडथळा ठरू शकतात. यांचा संग्रहालय प्रशासनाने विचार करणे गरजेचे आहे.

-----